# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## ई - कोटेशन नोटीस क्रमांक -

दिनांक : १९/१/२०१८

निम्नलिखित तपशिलाप्रमाणे नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात वैद्यकिय विभागा अंतर्गत असलेल्या आर.सी.एच. व एन.यु.एच.एम. कार्यक्रमातंर्गत कार्यशाळा,प्रशिक्षण व विविध बैठका राबविणेकामी चहा, नाश्ता व जेवण इ.चे बाजार भाव (Quotations) बोलविणेत येत आहेत.

कोटेशन फॉर्म मिळण्याची तारीख : १९/१/२०१८

कोटेशन भरुन देण्याची अंतिम तारीख : २५/१/२०१८

कोटेशन फॉर्म मिळण्याची ठिकाण व वेळ : वैद्यकिय विभाग, राजीव गांधी भवन,
शरणपुररोड, नाशिक.
वेळ : सकाळी १० ते ५ पर्यंत

**कोटेशन जमा करण्याचे ठिकाण** :- कोटेशन फॉर्म पुर्ण भरुन वैद्यकिय विभाग, राजीवगांधी भवन येथे कार्यालयीन वेळेत देण्यात यावे. अपुर्ण कोटेशन स्विकारले जाणार नाहीत. कोटेशन फॉर्म स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क राखुन ठेवण्यात येत आहे.

Sd/-
वैद्यकिय अधिक्षक
नाशिक महानगरपालिका, नाशिक

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## कोटेशन फॉर्म

**दिनांक : / /२०१८**

निम्नलिखित तपशिलाप्रमाणे नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात वैद्यकिय विभागा अंतर्गत असलेल्या आर.सी.एच. व एन.यु.एच.एम. कार्यक्रमातंर्गत कार्यशाळा,प्रशिक्षण व विविध बैठका राबविणेकामी चहा, नाश्ता व जेवण इ.चे बाजार भाव (Quotations) बोलविणेत येत आहेत. तरी त्या बाबतचे दर पाकिटातून दिनांक २५/१/२०१८ पर्यंत आमचे कार्यालयात पाठविण्याचे करावे.

| अ. क्र. | तपशिल | तपशिल (मेनु प्रति नग) | ई कोटेशन दर सर्व करांसहित |
|---|---|---|---|
| १ | चहा | चहा | |
| | | कॉफी | |
| २ | नाश्ता | पोहे १ प्लेट किवा २०० ग्रॅम | |
| | | उपमा १ प्लेट किवा २०० ग्रॅम | |
| | | मुगभजी १ प्लेट किवा २०० ग्रॅम | |
| | | मुगशिरा १ प्लेट किवा २०० ग्रॅम | |
| | | बटाटावडा पावासहित | |
| | | इडली सांबार एक प्लेट (२ नग) | |
| | | मेदुवडा सांबार एक प्लेट (२ नग) | |
| | | ढोकळा एक प्लेट (४ नग) | |
| | | समोसा एक प्लेट (१ नग) | |
| | | साबुदाणा वडा एक प्लेट (२ नग) | |
| | | मिसळपाव (२ नग पाव) | |
| | | पावभाजी (२ नग पाव) | |
| | | साबुदाणा खिचडी १ प्लेट किवा २०० ग्रॅम | |
| | | व्हेज सॅण्डवीच (२ नग) | |
| ३ | जेवण | वरणभात, मटकी (उसळ) बटाटा भाजी, लोणचे, सॅलाड, दहीरायता (बुंदी/ अननस), दोन चपाती, स्वीट (श्रीखंड/ गुलाबजाम/गाजर हलवा) | |
| | | वरणभात, मिक्सव्हेज कोल्हापुरी, वांग्याचे भरीत, लोणचे, सॅलाड, दहीरायता (बुंदी/पायनाएपल), दोनचपाती, स्वीट (श्रीखंड/गुलाबजाम/गाजर हलवा) | |
| | | व्हेज पुलाव, छोले काबुलीचना मसाला, भेंडीफ्राय, लोणचे, सॅलाड, दहीरायता (बुंदी/अननस), पुरी ४ नग, स्वीट (श्रीखंड/ गुलाबजाम/गाजर हलवा) | |
| | | वरणभात, पनीर मसाला, प्लॉवर, लोणचे, सॅलाड, दहीरायता (बुंदी/अननस), दोन चपाती, स्वीट (श्रीखंड/गुलाबजाम/गाजर हलवा) | |
| | | जिरा राईस, दालतडका, बॅगन मसाला, लोणचे, सॅलाड, दहीरायता (बुंदी/अननस), दोन चपाती, स्वीट (श्रीखंड/गुलाबजाम/गाजर हलवा) | |
| | | मसालाभात, ग्रीनपीस मसाला, कोबी चनाडाळ, लोणचे, सॅलाड, दहीरायता (बुंदी/अननस ), दोन चपाती, स्वीट (श्रीखंड/गुलाबजाम/गाजर हलवा) | |
| | | कढीखिचडी,शेवभाजी,बटाटाभाजी,लोणचे,सॅलाड,दहीरायता(बुंदी/अननस), दोन चपाती,स्वीट (श्रीखंड/गुलाबजाम/गाजर हलवा) | |
| | | वरणभात, राजमा, मिक्स लोणचे, सॅलाड, दहीरायता (बुंदी/अननस), दोन चपाती, स्वीट (श्रीखंड/गुलाबजाम/गाजर हलवा) | |

सदरचे दर पुरवठादार यास किमान १ वर्षाकरिता बंधनकारक राहतील. प्रशिक्षणाच्या वेळी जेवण व खादय पदार्थ पुरवण्याच्या वेळा आपणास दुरध्वनी व्दारे सागण्यात येईल. ऑर्डर मिळाल्यानंतर ती नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन,मुख्यालय येथे पोहोचवण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहिल. सोबत जोडलेल्या अटीशर्ती मला मान्य आहे.

उपरोक्त ई - दरपत्रक शक्य झाल्यास दि. २५/१/२०१८ रोजी वैद्यकिय विभाग, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक महानगरपालिका, नाशिक येथे उघडण्यात येईल.

# अटीशर्ती

सदर आदेशातील अटी व शर्ती बंधनकारक राहतील आदेशातील अटी व शर्ती मान्य असलेबाबत रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन या कार्यालयास सादर करावा करारनामा सादर केल्यावरच आदेशाची अंमलबजावणी सुरु होईल. त्यानुसार अटीशर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) निविदा प्रक्रियेमध्ये दिलेले जेवणाचे मेनु नुसारच जेवण पुरविण्यात यावे यांची नोंद घेण्यात यावी.

२) खादय पदार्थाच्या वितरणासाठी लागणारे फर्निचर कार्यालयाकडुन पुरविण्यात येईल. परंतु स्वयंपाकासाठी लागणारे गॅस व इतर भांडी, उपकरणे इ.या कार्यालयाकडुन पुरविण्यात येणार नाही.

३) खादय पदार्थ दर्जा तपासणी रजिष्टर ठेवण्यात यावे व सदरचा रजिष्टर कार्यालयातील अधिकारी व कर्मचायांकडुन दैनंदीन आहार तपासुन रजिष्टरमध्ये अनुकुल/प्रतिकुल घेण्यात यावे.

४) स्वयंपाकासाठी/वाढणेसाठी नेमलेले कर्मचारी निरोगी असावेत. सदर कर्मचाऱ्यांची वैदयकिय तपासणी करुन तसे प्रमाणपत्र कार्यालयात सादर करावे. तसे न केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

५) नाश्ता/जेवण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीची हजेरी भोजनगृहात ठेवावी. ज्यांनी नाश्ता/जेवण घेतले त्यांचेच बिल अदा करण्यात येईल व तसेच प्रत्यक्ष हजेरी पत्रक बिलासोबत जोडणे आवश्यक राहिल व तसेच बिलावर संबधीत सत्र समन्वयाकडुन प्रमाणीत करुन घ्यावे.

६) नाश्ताचा दररोजचा मेनु ठरल्याप्रमाणेच प्रशिक्षणार्थीना दिला जाईल याची दक्षता घ्यावी. तसे न झाल्यास त्या दिवसाच्या नाश्ताचे व जेवणाचे बील अदा केले जाणार नाही.

७) भोजन कक्षात स्वच्छता ठेवावी. भोजन कक्षात भोजन करण्यासाठी चांगले स्टीलचे भांडे असावेत.

८) अन्नविषबाधा होऊन शारीरीक/जिवितहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या ठेकेदाराची राहील.

९) उपहारगृह प्रतिदीन प्रतिदिनची नुकसान/मोडतोड,पुरविलेले फर्निचर,साहित्य इ. हरविणे/मोडतोड/नुकसान इ उपहारगृह ठेकेदाराकडुन वसुलपात्र राहील व प्रचलित नियंमाचे आधारे वसुल करण्यात येईल.

१०) खादय पदार्थाचा दर्जा समाधानकारक नसल्यास कोणत्याही प्रकारची सुचना न देता करार संपुष्टात आणण्याचा अधिकार वैदयकिय अधिक्षक यांना राहील.

११) जेवणाबाबत प्रशिक्षणार्थीची तक्रार आल्यास तसेच जेवणाचा गुणात्मक दर्जा नसल्यास आपल्याला पुर्वसुचना न देता आपला ठेका रदद करण्यात येईल.

१२) प्रशिक्षणार्थीचे जेवणाचे देयके प्रशिक्षण संपल्यानंतर ७ दिवसात च्या आत दयावे.

१३) अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

**१४)<u>दंडात्मक कार्यवाही</u>**

१) नाश्ता/जेवण मेनु प्रमाणे न दिल्यास दंडात्मक कार्यवाहिस सामोरे जावे लागेल.

२) वरील अटी शर्तीचे पालन न केल्यास वेळोवळी दंड आकारण्यात येईल.

भोजन/ साहित्याची तपासणी वैदयकिय अधिक्षक/आर.सी.एच. नोडल ऑफीसर सो. यांचेमार्फत करण्यात येईल.अन्नपदार्थाचा पुरवठा निविदेतील वर्णनाप्रमाणे व संस्थच्या जागेत फक्त सर्व्ह करावयाचे असुन सर्व पदार्थ प्रतिव्यक्ती प्रतिदीन व निविदा मध्ये नमुद केलेल्या प्रशिक्षणाच्या तरतुदीनुसार अन्नपदार्थ पुरवावे लागतील व त्यानुसार अनुदानाचा उपलब्धते नुसार आपणास देयक अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

Sd/-

**वैद्यकिय अधिक्षक**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**